# समकालीन कवींमध्ये भालचंद्र नेमाडे यांच्या कवितेचे स्थान

*प्रस्तुत शोध निबंधात आजच्या मराठी साहित्य क्षेत्रातील नामवंत साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांच्या काव्याचे समकालीन कवींमध्ये कसे स्थानआहे याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. भालचंद्र नेमाडेंच्या काव्यात सर्जनशीलवृत्तीचा, संवेदनांचा आत्मचरित्रात्मक अनुभव येतो. याविषयी अभ्यासकांच्या मतांच्या आधारे या शोध निबंधात नेमाडेंच्या कवितेचे स्थान शोधण्याचा प्रयत्न केला आहे.*

**डॉ.जयश्री प्रकाश शास्त्री**

अर्वाचीन मराठीकाव्य परंपरेत केशवसुतांनी आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी क्रांती घडवून आणली. त्यानंतर मर्ढेकरांपासून नवकवितेच्या युगाला आरंभ झाला. त्यानंतर नारायण सुर्व्यांना तिसरे केशवसुत म्हटले जाऊ लागले. केशवसुत मर्ढेकरांप्रमाणेच मराठी कवितेला एक नवे वळण सुर्वे यांनी दिल्याचे मान्य केले गेले. तत्पुर्वी काही दिवस मराठीत लघुअनियतकालिकाची चळवळ निर्माण झाली. या चळवळी मागे प्रस्थापितांविरुद्ध विद्रोह होता.त्याच बरोबर आपला आशय आपल्याच पद्धतीने मांडता आला पाहिजे आणि तथाकथित प्रस्थापित झालेल्या साहित्य संकल्पनांना धक्का दिला पाहिजे व या साहित्याचे प्रकाशन झाले पाहिजे या हेतूने ही चळवळ सुरू झाली. या चळवळीतून अनेक कवी कादंबरीकार व समीक्षक निर्माण झाले समकालीन साहित्याला प्रत्थापित करण्याच्या उद्देशाने ही चळवळ उपयुक्त ठरली. आपल्या सभोवतीचे सामाजिक वास्तव प्रकट करणे याला प्राधान्य दिले गेले. आपल्या काव्याच्या प्रेरणा व प्रवृत्ती समकालीन सामाजिक पर्यावरण आणि वास्तवातच शोधल्या पाहिजेत. ही भूमिका घेऊन हे लेखन करण्याचा प्रयत्न केला गेला. सांकेतिक आविष्कारा विषयी वाटणाऱ्या असमाधानातून अनियतकालिक चळवळीतले लेखक साहित्य निर्मिती करीत होते. अनियतकालिकातून लिहिणाऱ्या कवींपैकी काही कवींनी एक वेगळी भूमिका घेतली. रंगनाथ पठारे यांनी अशा कवींच्या परंपरेला पहिली परंपरा म्हटले आहे. ''या कवींना परंपरेतील सामर्थ्य देणाऱ्या बळ देणाऱ्या गोष्टी स्वीकारायच्या असतात आणि सभोवतालच्या गुरसटलेल्या काव्याशयाच्या विरूद्ध सांकेतिक शैलीच्याविरुद्ध बंड करायचे असते, ह्याचे भान होते. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या कवितेच्या प्रेरणा हा एका बाजूने महानुभावाचे वाङ्मय, वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान आणि साहित्य, लोकसंस्कृती आणि मौखिक परंपरांमधील साहित्य यांच्यामध्ये शोधल्या.''[1] यांनी एकाबाजूने मर्ढेकर, रेगे, मुक्तिबोध, मनमोहन यांचे संस्कार स्वीकारले तर दुसरीकडे आपल्या सभोवतीच्या तसेच ग्रामसंस्कृतीच्या तसेच निसर्गाच्या सान्निध्यातील मानवी संबंधाचा वेग घेतला. या चळवळीतून पुढे अनेक नामवंत कवी निर्माण झाले. या चळवळीला अशोक शहाणे आणि भालचंद्र नेमाडे यांनी तात्त्विक पाया दिला आणि दिशाही दिली. यात सतीश काळसेकर, वसंत गुर्जर, मनोहर जोग, नामदेव ढसाळ, तुळसी परब, चंद्रकांत पाटील, अरुण कोलटकर अशी काही नावे पुढे आली. या लघुपत्रिकेतील कवींनी नेमके काय केले हे रवींद्र घनी यांनी नेमक्या शब्दात सांगितले आहे; "संतप्त तरुण पिढीला नवसाहित्याच्या चळवळीत बंडखोरी करीत राहण्याचे, परंपरेकडे नव्या दृष्टीने पाहण्याचे बळ मिळाले. वरवर भंकस, विक्षिप्त वाटणाऱ्या प्रवृत्तींमागे जीवनाची एक खोल गंभीर जाणीव आहे. मानवी अस्तित्वाचे एक भान आहे. वाङ्मयीन संस्कृतीच्या मूल्यांची कदर आहे. एक व्याकुळता आहे. अस्तित्ववाद आणि जीवनाच्या असंबद्धतेचं भान या द्वारा एक नवी संवेदनशीलता मराठी कवितेत रूजविण्याचा प्रयोग केला."[2]

उपरोल्लेखित कवींपैकी कोलटकर, चित्रे, ओक, गुर्जर, काळसेकर, परब यांच्या कवितांमधून महानगरी जाणिवा प्राधान्याने व्यक्त होत होत्या. त्यांच्या तुलनेत नेमाडेंची कविता एकीकडे महानगरी जीवनाचे चित्रण करीत असली तरी या महानगरी जाणिवांना छेद देत ग्रामसंस्कृतीतील व लोकसंस्कृतीतील जाणिवांचे संदर्भही स्वीकारीत होती. महानोर पूर्णतः ग्रामीण व लोकसांस्कृतिक जाणिवा आपल्या काव्यातून व्यक्त करीत होते व त्याला श्रृंगाराचा स्पर्श देत होते. या तुलनेत नेमाडे यांचे काव्यविश्व वेगळे होते. महानगराचे सांस्कृतिक दारिद्र्य अस्तित्वाचे हरवलेपण परात्मभाव कितीतरी गोष्टी नेमाडेंच्या कवितेत दिसतात. परंतु व्यक्तिचित्राच्या अनुषंगाने हे सारे काव्यदर्शन घडते. समकालीन कवींमध्ये अनुभवनिष्ठ जाणिवेचे

*लोकमान्य महाविद्यालय, वरोरा ( चंद्रपूर ) महाराष्ट्र*

अंग म्हणून लैंगिकतेकडे पाहिले गेले. परंतु नेमाडेंच्या कवितेने या बाबीकडे दुर्लक्ष केले. नेमाडेंनी आपला स्वतःचा वेगळा मार्ग चोखाळला. त्यांच्या कवितेत नागर आणि ग्रामातील संमिश्र अनुभव पहायला मिळतात. त्यांच्या कवितेचा आशय ग्रामीण संस्पर्शासह महानगरीय वास्तवापर्यंत पसरलेला आहे. त्यांनी हे करताना देशी भान राखले. महानगरी जीवनातील परात्मतेचा अनुभव जसा आपल्या काव्यातून व्यक्त केला तसेच ग्रामजीवनातील व्यक्तिगत अनुभवातून समाजाकडे ते पाहात होते. नेमाडेंनी स्वतःची भाषा, जगणे, भोवतालचा परिसर संस्कृती व समाज, लोकजीवन व लोकगीत ह्यांच्याशी आपल्या कवितेची नाळ जोडली. हे सारे करताना मानवतावादी प्रगल्भ जीवन दृष्टीचा त्यांनी स्वीकार केला.


नेमाडेंची कविता प्रामुख्याने आत्मचरित्रात्मक स्वरूपाची असल्याने रोजच्या जगण्याचे ऊर्ध्वपातन त्यांच्या कवितेत झालेले दिसते. तसे व्हावे ही त्यांची अपेक्षा त्यांनी 'देखणी' च्याप्रस्तावनेत बोलूनही दाखवलेली होती. त्यांच्या कवितेतून बहुस्तरीय आत्मचरित्राचा निर्देश होतो. ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे. त्यांची लेखन वृत्तीही स्वतःच्या जगण्याचे थेट शब्दांकन करणारी आहे व त्यामुळे त्यामध्ये अस्तित्व लक्ष्यित्व हे सूत्र आपोआपच गुंफलेले आहे. परंतु हा जो अस्तित्वाचा आणि परात्मभावाचा अनुभव कवी व्यक्त करतो. त्याच्या तुटलेपणाच्या जाणिवेला एक अध्यात्मिक अंगही आहे. त्यांचे संवेदनशील मन या विपरीत स्थितीने थोडेसे भयभीतही होते. पण तरी दुःख पचवण्याची शक्ती त्यांनी प्राप्त केली. इतर कवींच्या कवितेतील अस्तित्ववादी रुपापेक्षा नेमाडेंच्या जाणिवा फारच वेगळ्या आहेत. समकालीन सामाजिक, सांस्कृतिक आणिमूल्य अमूल्यात्मक वास्तवाच्या युग जाणिवा नेमाडेंच्या कवितेत फार चांगल्या प्रकारे आविष्कृत होतात. ग्रामसंस्कृतीचे चित्रण करतानाही त्यांचे सामाजिक भान फार जागे असते. 'कशा रांगोळ्या काढता' या कवितेतून ही बाब चांगली लक्षात येते.

नेमाडेंनी चळवळीतील कवींच्या तुलनेत स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. चळवळीतील कवींनी आपली कविता प्रत्यक्ष जगण्याशी निगडित ठेवण्याचा प्रयत्न केला. प्रत्येकानी आपली काव्य भाषाही वेगळी घडविली. परंतु नेमाडे यांनी आपल्या कवितेच्या निर्मिती प्रक्रियेत भाषिक सर्जन महत्वाचे मानले. भाषेच्या अंतःस्तरात जगण्याचा प्रत्यक्ष क्षण बुडवून महत्वाचे म्हणजे देशी भान बाळगून आपल्यास शास्त्र अशा संतसाहित्याच्या व लोकसाहित्याच्या परंपरेलापुढे नेण्याचा व ती विकसित करण्याचा प्रयत्न केला. हे त्यांचे मराठी कवितेला मोठे योगदानच म्हटले पाहिजे. नेमाडेंच्या शब्दात सांगायचे तर, "प्रत्येक काळातला साहित्याचा कस त्या त्या काळातल्या दुःख सोसण्याच्या पातळीवर ठरतो."[3] नेमाडेंनी या दुःखालाच काव्यनिर्मितीचे अधिष्ठान मानले. नेमाडेंच्या समकालीन कवींमध्ये या त्यांच्या भूमिकेच्या परिघात बसू शकणारे कवी फार कमी आढळतील.[4] असे त्यांच्याबद्दल जे विधान केले गेले ते यथोचितच म्हणावे लागेल. म्हणूनच कोलटकर, चित्रे, ओक, गुर्जर, काळसेकर, परब यांच्या तुलनेत नेमाडेंची कविता निश्चितच आपल्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाने वेगळी वाटते.

*संदर्भ :*

*(1) पठारे, रंगनाथ : आस्थेचे प्रश्न.*
*(2) स्वातंत्र्योत्तर कविता, प्रदक्षिणा, भाग–2, कॉन्टिनेन्टल प्रकाशन*
*(3) नेमाडे, भालचंद्र : टीका स्वयंवर, साकेत प्रकाशन.*
*(4) सानप, किशोर : भालचंद्र नेमाडे यांची कविता : एक आकलन, साकेत प्रकाशन.*

❀❀




'रिसर्च लिंक' की सदस्यता का शुल्क भुगतान राष्ट्रीयकृत बैंकों द्वारा सीधे ट्रांसफर या जमा किया जा सकता है। बैंक का विवरण निम्नानुसार है-

**बैंक :** स्टेट बैंक ऑफ इण्डिया

**ब्रांच :** ओल्ड पलासिया, इन्दौर.

**कोड** - **SBIN 000 3432**

**खाते का नाम :** **रिसर्च लिंक,**

**खाता नंबर** - **63025612815**

भुगतान की मूल रसीद, शोध-पत्र एवं सीडी के साथ कार्यालयीन पते पर भेजना अनिवार्य है।